# बातमीपत्र
## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर
### माहिती कक्ष, दि. २१ एप्रिल २०२३

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २२३/२०२३ भादंविसक ३८०,४५४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ०८/०४/२०२३ रोजी ०९.०० वा ते १८.०० वा चे दरम्यान, फिर्यादीचे राहते घरी, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २०/०४/२०२३ रोजी ००.२८ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | उमाकांत संभाजी भालेराव, वय- ४७ वर्षे, रा. सी २७, स्मृती विहार, सिध्देश्वर नगर, आरटीओ ऑफिस आंबेडकर चौक, विजापूर रोड, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | ३,७००/- रु त्यात रेडमी कंपनीचा मोबाईल, सोनाटा मनगटी घडयाळ व पैशाचा गल्ला व रोख रक्कम |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे कुंटुंबियांसह उस्मानाबाद येथे लग्नाकरीता गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे घरी कोणी नसताना, घराचे मुख्य दरवाजाचे कडी कोयंडा उचकटुन, घरात प्रवेश करुन फिर्यादीचा वरील वर्णनाचा ऐवज फिर्यादीच्या संमीतवाचून चोरुन नेला आहे म्हणून. तपासः- पोहेकॉ/ १२०१ जाधव |

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २४२/२०२३ भादंविसक २७९,३३८, मोवाकाक १८४/१७७ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १९/०४/२०२३ रोजी १२.१५ वा चे सुमारास, सोलापूर पुणे हायवे रोड, समर्थ रेसीडेन्सी समोर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २०/०४/२०२३ रोजी १९.५४ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | इंद्रजित गोकुळ बागले, वय- ३५ वर्षे, रा. इंदुताई आंबेडकर नगर, जुना कारंबा नाका, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चारचाकी वाहन चालक नाव पत्ता माहित नाही |
| **जखमीचे नाव** | : | नितीन गोकुळ बागले, वय- ३३ वर्षे, रा. इंदुताई आंबेडकर नगर, जुना कारंबा नाका, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे घरी असताना, गल्लीतील मित्र अमित कसबे हा घरी आला व त्याने सांगितले की, वरील ठिकाणी फिर्यादीचा भाऊ नितीन हा पायी चालत जात असताना मार्केट यार्ड कडुन पुण्याकडे भरधाव वेगाने जाणाऱ्या अज्ञात चारचाकी वाहनाने त्यास धडक देवून तो निघुन गेला आहे. त्यात नितीन हा गंभीर जखमी झाल्याने त्यास डिव्हायडरवर उचलुन ठेवले आहे. त्यावर फिर्यादी, फिर्यादीचा पुतण्या, आतेभाऊ असे मिळुन वरील ठिकाणी जावून पाहिले असता, नितीन याचे तोंडास व डोकीस जबर मार लागुन तो गंभीररित्या जखमी अवस्थेत बेशुध्द पडलेला दिसला. म्हणून फिर्यादीची अज्ञात वाहन चालकाविरुध्द फिर्याद आहे. तपासः- पोना/ १४२२ ढोबळे |

# एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | २३६/२०२३ भादंविसक ३७९ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि. १७/०४/२०२३ रोजी १०.०० वा ते दि. १८/०४/२०२३ रोजी ०६.०० वा चे दरम्यान, जगदंबा देवी मंदिर जवळ, सरवदे नगर, मुळेगाव रोड, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि २०/०४/२०२३ रोजी १५.५५ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | राजशेखर सिध्दाराम माशाळ, वय- ३२ वर्षे, रा. ५२, जगदंबा देवी मंदिर जवळ, सरवदे नगर, मुळेगाव रोड, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | **:** | २०,०००/- रु एक काळया व लाल रंगाची होन्डा सी बी शाईन मोटार सायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीची वरील वर्णनाची मोटार सायकल क्रं. एम एच १३ डी एच ३०३८ ही वरील ठिकाणी फिर्यादीचे घरासमोर रोडलगत लावलेली असताना, कोणीतरी अज्ञात चोरटयाने, फिर्यादीच्या संमतीवाचून, मुद्दाम लबाडीने चोरुन नेली आहे म्हणून. तपासः- पोना/ १२६६ भांगे |